**Anekant Journal of Humanities and Social Sciences**
A Half Yearly and Peer Reviewed Open Access Print and Online Journal
http://www.humanitics.org/

**RESEARCH ARTICLE**

**Vol. IV, Issue I, August 2021**

# Title- जे. कृष्णमूर्तींचा जीवन विषयक दृष्टिकोन

सुषमा संगई
लघुलेखक,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती, पुणे.
Email: - sushmasangai0812@gmail.com
M.- 8805886350

**सारांश:-**

आंध्र प्रदेशातील चित्तूर जिल्ह्यात मदनपल्ली या गावी जिद्दू कृष्णमूर्ती यांचा जन्म ११ मे १८९५ रोजी झाला. जगातील अनेक विचारवंत व तत्ववेत्त्यांपैकी एक. त्यांनी जीवनविषयक विचार अभिव्यक्त केले. स्वतंत्र विचारसरणी हा त्यांचा स्थायीभाव. 'प्रेम' हा कृष्णजींच्या विचारांचा आत्मा. भीती, लोभ, वासना, क्रोध, हिंसा या भावनांचा ते शोध घ्यायला सांगतात. कृष्णमूर्ती मुक्त शिक्षणाचा आग्रह धरतात. पदव्यांच्या ओझ्याने दबून न जाता शिक्षणामुळे स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास घडविणारे व जगावे कसे? हे शिकविणारे खरे शिक्षण असे त्यांचे मत आहे.

**प्रस्तावना:-**

जिद्दू कृष्णमूर्ती हे इ.स. १८९५ ते १९८६ या कालावधीमध्ये होऊन गेलेले आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्वयंप्रज्ञ तत्वज्ञ. वयाच्या सहाव्या वर्षी ते शाळेत जायला लागले. पण त्यांचे शाळेच्या अभ्यासात मन रमेना. निसर्ग, वृक्षमेघादिकांचे भान हरपून निरीक्षण करणे. त्यांची शून्यात लागलेली दृष्टी, गूढ ज्ञान, बोलण्याची अनिच्छा. दैनंदिन व्यवहारातील बाबींबाबत कमालीची उदासीनता यामुळे शाळेत ते सर्वांना अविकसित व मंद बुद्धी वाटत असे. कृष्णमूर्ती अगदी धूसर आणि स्वप्नाळू होते. अभ्यासाबद्दल तिटकारा होता. परंतू ते विलक्षण तीव्रतेचे निरीक्षक होते. त्यांच्या स्वभावात विलक्षण औदार्य होते. आणि त्यांचा हाच गुणविशेष पुढे त्यांच्या जीवनभरही होता. शाळेतून येताना ते नेहमीच पाटी, पुस्तक व पेन्सिलशिवाय

घरी यायचे. परंतू त्यांच्या स्वभावामध्ये स्वप्नाळूपणाच्या विरोधी असा गुण म्हणजे त्यांना यंत्रांबद्दल प्रेम होते. घरातील घड्याळ त्यांनी पूर्णपणे उघडून पुन्हा ते पूर्ववत जोडेपर्यंत अत्यंत तन्मयतेने व एकाग्रतेने त्यांनी ते जोडले. जेवणाचेही भान त्यांना नव्हते. जीवनातील सत्य शोधणे त्याचा आविष्कार करणे, नितीविषयक, जीवनविषयक ध्येयांचा पुरस्कार करून ती आचरणात आणणे, समाजामध्ये त्याची रुजवण करून भावी पिढी तयार करणे. या प्रवासामध्ये शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्व व याचाच परिपाक म्हणजे जीवनाचा आनंद या दोहोंची सांगड घालणारे विचारवंत, थोर शिक्षणतज्ञ जिद्दू कृष्णमूर्ती. थीऑसॉफिकल सोसायटीचे अनेक वर्षे त्यांनी काम केले. थीऑसॉफिकल सोसायटीच्या कामानिमित्त ते हिंदुस्थानच्या वाटेवर असतानाच त्यांचा भाऊ नित्यानंद याची तब्येत घसरू लागली आहे असा त्यांना निरोप आला. सुवेझ कालव्यात जहाज प्रवेश करीत असतानाच १३ नोव्हेंबर १९२५ रोजी त्यांना नित्यानंदच्या मृत्यूची बातमी मिळाली. त्यांचे त्यांच्या भावावर प्रचंड प्रेम होते. नित्यानंदच्या बातमीने त्यांचे सारे विश्वच कोलमडले. त्यांचा सर्व बाबींवरचा विश्वास उडाला. रात्री नित्याच्या आठवणीने कृष्णमूर्ती दु:खी, कष्टी होत, रात्रभर ते नित्याच्या आठवणीने हुंदके देत असत. एकमेकांशी गप्पा गोष्टी करणे, एकमेकांना कामात गुंतवून घेतलेले पाहणे ही सर्व स्वप्ने आता संपली आहेत असे ते म्हणत असत. हे दु:ख विसरायला त्यांना बराच काळ घालवावा लागला. त्यांच्या जीवनाला येथूनच कलाटणी मिळाली.

कृष्णमूर्तींच्या दृष्टीने शिक्षणात शिक्षकाचे स्थान फार मोठे आहे. स्वत: संस्कारबद्धतेतून ते मुक्त झाले आणि आपल्या विद्यार्थ्यांनाही मुक्त करण्याचे त्यांनी ठरविले. ख-या शिक्षणाची घडण शिक्षकच करू शकतो व त्यासाठी शिक्षकच यासाठी मुख्य आहे व स्वतःच्या मनोविश्वाची घडण शिक्षकाला असणे महत्वाचे आहे असे ते म्हणतात. सर्जनशीलतेतून कुठल्याही क्षेत्रातील तंत्र निर्माण होते. यालाच कला म्हणतात. मुलास जेव्हा चित्र काढण्याची लहर येते तेव्हा तो चित्रकलेचे तंत्र इ. न पाहता, कशाचीही फिकीर न करता त्याची कला साकारतो. तसेच शिक्षकाच्या मनात देखील नवनिर्मितीची प्रेरणा निर्माण झाली तर ते साचे शोधत फिरणार नाहीत असे कृष्णमूर्ती म्हणतात. जेथे वेगवेगळ्या साचेबंद शिक्षण पुरविणा-या शाळा आहेत त्यापेक्षा ज्या शिक्षकांना आकलन झालेले आहे व शाळा अल्प मुले आहेत. अशा शाळांना ते महत्वाच्या शाळा समजतात. कारण तेथे विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष देऊन त्यांच्या आत्मविकासाबरोबरच सर्वांगीण विकासास प्राधान्य दिले जाते. या विचारातूनच कृष्णमूर्तींनी स्वतःच्या शाळा काढल्या. परंपरागत साचेबंध शिक्षणावर त्यांनी स्पष्ट शब्दात ताशेरे ओढले आहेत. शाळा तुरुंग नाही तर प्रेम ही भाषा बोलणारी, आनंददायी व्यवस्था असली पाहिजे उदा. उगवणारा सूर्य, मावळणारा सूर्य, चंद्राचे शीतल चांदणे, समुद्रात उठणा-या लाटा, त्यावर उठणारे तरंग, शांत निरव वातावरणात पक्ष्यांचे कूजन ऐकणे, व्यक्ती-व्यक्ती मधील स्वच्छ भावना इ. गरजू, पीडित, दीन-दु:खी व्यक्तीचे अंत:करण ओळखून त्याला वेळीच केलेली मदत म्हणजे प्रेम, ही आनंददायी शिक्षण व्यवस्था असली पाहीजे हे विचार त्यांनी मांडले. व्यक्तीस परंपरागत विचारांनी जखडून टाकून जुन्या विचारांचा प्रभाव, विविध बाबी इ. वर ते नाराजी व्यक्त करताना दिसतात.

स्व' चा शोध 'मी' चा त्याग नी स्वतंत्र विचारांची निर्मिती करून माणुसकीचा मेळ घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला. विश्वाच्या जडणघडणीमध्ये उपयुक्त होतील असे दिव्य व उदात्त विचार त्यांनी दिले आहेत.

शिक्षकाला महत्व नाही तर ज्या शिक्षकाने जे काही सांगितले त्याला महत्व आहे. ते विचार जसेच्या तसे पुढे लोकांपर्यंत जातील व त्यात कोणत्याही परिस्थितीत बदल होऊ देऊ नका ही कृष्णमूर्तींची शेवटची इच्छा. त्यांचे विचार व त्यांची जीवनविषयक दृष्टी जाणून घेण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

**जे. कृष्णमूर्ती यांची जीवनाकडे बघण्याची दृष्टी -**

जे. कृष्णमूर्ती तटस्थ राहून स्वत:चे अवलोकन करण्यास सांगतात. संबंधित भावनेचे निरीक्षण करून आपल्यातील विकार भावनेला शरण न जाता भावनेचे मूळ शोधण्यास सांगतात. कृष्णमूर्तींनी भारतभर व भारताबाहेर केलेल्या त्यांच्या दौ-यांतून, त्यांनी दिलेल्या प्रवचनातून व त्यानंतर विचारल्या गेलेले प्रश्न व त्यावर घडलेल्या अनेक संवादातून त्यांनी भीती, लोभ, वासना, क्रोध, हिंसा या भावनांचाच शोध घ्यायला सांगितला आहे. एकमेकांप्रती असलेल्या भावनांतूनच युद्धे होतात असेही ते म्हणतात. आपल्या मनातील भावना स्वच्छ ठेवणे महत्वाचे आहे. जे काही ऐकणे आणि बघणे हे पूर्वग्रहविरहित असावे. शब्द, माणसा-माणसांमधील नातेसंबंध, आठवणी, स्मृती इ. शिवाय आपण जग बघू शकत नाही. अशा सर्व गोष्टींकडे पूर्वग्रहांशिवाय बघणे व ऐकणे म्हणजेच 'प्रज्ञावंत' 'प्रज्ञाशील' मनाची उत्पत्ती आहे. आपण समाजाचे परिवर्तन करण्यापेक्षा व्यक्तीतील परिवर्तन करणे गरजेचे असण्यावर ते भर देतात. आकलन झालेल्या व्यक्तीचे अनेक व्यक्तींमध्ये परिवर्तन घडेल व समाजाची जडणघडण होईल व एक सुदृढ विचारांचा समाज निर्माण होईल. हा वैश्विक विचार कृष्णमूर्ती देतात.

**मुक्त शिक्षणाची गरज -**

विद्यार्थ्यांवर लादले गेलेले पारंपरिक साचेबंद शिक्षण म्हणजे त्याच्यातील स्व-निर्मितीला घातलेला पायबंद आहे. विद्यार्थ्यांना संवेदनशील व सक्षम बनविणे आवश्यक आहे. जबरदस्ती, धमकी यामुळे त्यांच्या विचारांना कलाटणी मिळते. ते ध्येयहीन होऊन भरकटले जाण्याची भीती असते. त्यातून ते विकृत होतात. विद्यार्थ्यांना जग, निसर्ग, कृती याबद्दल सजग राहून अंत:रंगात उठणा -या भावनांचे नियमन करता आले पाहिजे. यासाठी प्रज्ञाशील होणे आवश्यक आहे. पदव्यांच्या ओझ्याने ब-याच वेळी माणसामध्ये 'अहं' निर्माण होतो व माणसाचा विक्षिप्तपणा त्याच्या 'मी' पणा मध्ये आसनस्थ होतो. हा 'अहं' आपल्या आजूबाजूच्या व्यक्तींशी, समाजातील घटकांशी संघर्ष निर्माण करतो. परिणामी असंतोषजनक परिस्थिती निर्माण होते व समाजव्यवस्था बिघडविण्यास कारणीभूत होते. अहं चे उच्चाटन केले तर विद्यार्थ्यांमध्ये भावविवशता, स्वप्नरंजनात्मकता वा काल्पनिकता जोपासून प्रेम आणि ममता निर्माण होईल. जेव्हा मन, हृदय व शरीर यांचा एकमेकांशी संवाद होईल तेव्हाच विद्यार्थ्यांच्या मानसिकतेची उत्कृष्टरित्या जडणघडण होईल.

**माणसांमधील वृत्ती-प्रवृत्तींचे दर्शन -**

माणसांमध्ये क्रूरता, हिंसाचार, आक्रमकता, अनाचार, राग, द्वेष, असूया या गोष्टी वाढल्यामुळे एकमेकांशी स्वच्छ संवाद होऊ शकत नाही. परिणामी सुदृढ असे नाते तयार होत नाही. मग ते शिक्षक-

पालक असो की, विद्यार्थी-शिक्षक असो अथवा आई-वडील असो, मित्र-मित्र, पती-पत्नी असो. या सर्वच नात्यांमध्ये अडसर निर्माण होऊन नात्यांमधील निर्भेळ आनंद ते घेऊ शकत नाही. जीवन ही जगण्याची कला आहे. एकमेकांप्रतीचे प्रेम हा नात्यातील पूल आहे. हे लक्षात येत नाही व यामुळेच कलह, भांडणे, युद्ध, घटस्फोट, विभक्त कुटूंब पद्धती, ज्येष्ठ नागरिकांना भेडसावणारा एकाकीपणा, लहानांना लहानपणीच खुडून टाकणारे कोंडलेपण, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, हे असे प्रश्न आजही भयानक रूप घेऊन उभे आहेत. कृष्णजींनी दिलेल्या शिकवणुकीतून या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतात. त्यांच्या शिकवणूकीतून अवघ्या विश्वाची शांती दडलेली आहे. त्यांचे विचार समाजापुढे फारसे आले नाहीत. परंतू हे विचार दिव्य, अलौकिक असून भव्यत्वाची प्रचिती देतात हे नक्कीच. कृष्णमूर्तींच्या या जीवनविषयक दृष्टिकोनाची सर्वांनाच आज गरज आहे. शाळा- महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, राजकीय संस्था या सर्व ठिकाणी या विचारांचा विचार व्हावा व शाळा-शाळांमधून कृष्णमूर्तींचा विचार अभ्यासला जावा जेणेकरून व्यक्ती व्यक्ती न राहता 'कोहम, चा शोध घेऊन 'सोहं' चा विचार करेल आणि 'स्व' चा विकास साधेल. राष्ट्राच्या, देशाच्या सुदृढ बांधणीसाठी महत्वाचा घटक ठरेल असे वाटते.

**संदर्भ -**

१. या गोष्टींचा विचार करा - जे.कृष्णमूर्ती- साकेत प्रकाशन प्रा.लि., पुणे.
२. जे.कृष्णमूर्तींचे विचारधन - डॉ.कमलेश सोमण-गोयल प्रकाशन, पुणे.
३. जे.कृष्णमूर्ती आणि कृष्णमूर्ती स्कुल्स- हेरंब कुलकर्णी -मनोविकास प्रकाशन, पुणे.
४. जे.कृष्णमूर्ती जीवन आणि मृत्यू - मेरी ल्यटेन्स अनुवाद- प्रा.कल्याणी किशोर, साकेत प्रकाशन, पुणे.
५. शाळांना लिहिलेली पत्रे- जीवनाची निरंतर वाटचाल हेच शिकणे - जे.कृष्णमूर्ती अनु.वासंती पडते - पदमगंधा प्रकाशन, पुणे.